दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२७ नोव्हेंबर २०२४


काय चुकलं हे शोधणारे आयुष्यात पुढे जातात, कुणाचं चुकलं हे शोधणारे तिथेच राहतात.

## बहुमतानंतरही मुख्यमंत्री पदाचा पेच कायम?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** महाराष्ट्रात म हायुतीला निर्वाावाद बहुमत मिळालं आहे. भाजपाला अभूतपूर्व १३२ जागा जिंकता आल्या, तर शिंदेसेनेने ५५ जागांवर विजय मिळवला असून अजित पवारांच्या राष्ट्रवादीनेही ४० जागांवर आपला ठसा उमटवला. एकंदरीत राज्यात नवं सरकार स्थापन होण्यास संख्याबळाची अडचण नसतानाही निकालानंतर तीन दिवसांनीही सरकार स्थापन झालेलं नाही.

१४ वी विधानसभा संपुष्टात येऊन १५ वी विधानसभा अस्तित्वात आलेली असली तरीही राज्यात मुख्यमंत्री पदाचा घोळ अद्याप कायम आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील मुख्यमंत्री पदावरील रस्सीखेचमुळे राज्याला पुन्हा एकदा २०१९ सालची आठवण येऊ लागली आहे. दरम्यान, यावरूनच खासदार सुप्रिया सुळे यांनी महायुतीला



टोला लगावला आहे. त्या आज माध्यम ांशी बोलत होत्या.

मला आश्चर्य वाटत नाही. एवढं मोठं बहुमत मिळाल्यानंतर दुधाच्या भावात तीन रुपयांनी कपात केली. हे तीन रुपये शेतकऱ्यांना मिळणार होते. ज्यांनी विश्वासाच्या नात्यावर मतदान केलं त्यांच्यावर त्यांनी पहिला घणाघात गरीब शेतकऱ्यांचा केला. महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यात मोठ्या समस्या असतानाही मुख्यमंत्र्यांचा निर्णय घेतला जात नाहीय. हे लॉजिकच्या बाहेरचं आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**कमिटमेंटचा विषय आताही**

एकनाथ शिंदेंना कोणताही शब्द दिला नव्हता असं महायुतीचे नेते म्हणत आहेत, यावर सुप्रिया सुळेंना विचारलं असता, त्या म्हणाल्या, तो त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. कोणी कोणाला शब्द दिला, कोणी फिरवला. कारण २०१९ मध्ये उद्धवजी हेच सांगत होते. २०१९ मध्ये जसा कमिटमेंटचा विषय झाला तसाच २०२४ मध्ये झालाय. हे फार रंजक आहे.

**शिंदेंचा चेहरा घेऊन महायुती लढली**

२०१९ मध्ये हेच वारंवार सांगत होते. त्यांची युती तुटली ती यावरूनच तुटली. आता तीच परिस्थिती पुन्हा झालीय. शेवटी शिंदेंच्या चेहऱ्यांवरून झालं. तो शिंदेंचा करिष्मा होता हे सर्वांनी मान्यच करावं लागेल. एका सशक्त लोकशाहीत आम्हाला मान्यच करावं लागेल शिंदेंचा चेहरा घेऊन महायुती उभी राहिली त्याला यश मिळालं. ते नेते, मुख्यमंत्री आणि त्यांनी केलेले कष्ट मान्य करावं लागेल, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## नागपूरात मंगळवार ठरला घातवार, ३ अपघातात ४ ठार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, नागपूर :** नागपूर शहर आणि ग्रामीण भागात रस्ते अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून मंगळवार हा घातवार ठरला आहे. एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या विचित्र अपघातात दोन महिलांसह चौघांचा मृत्यू झाला.

पहिल्या घटनेत, मंगळवारी सकाळीच दहा वाजता सरस्वती म ाध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना घेऊन सहलीसाठी जाणारी बस उलटल्याने एक विद्यार्थिनी जागीच ठार झाली तर आठ विद्यार्थी गंभीर जखमी झाले. बसमधील शिक्षिकेसह अन्य ४४ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले. हा अपघात पेंढरी-देवळी परिसरातील वळणावर झाला. निर्वाणी ऊर्फ सई बागडे (१६) असे अपघातात ठार झालेल्या मुलीचे नाव आहे.

दुसऱ्या घटना हा खैरी मार्गावरील कामठी-नागपूर महामार्गावरील महिंद्रा शोरूमसमोर झाला.पुलाखाली उभ्या असलेल्या क्रेनला भरधाव ऑटोने धडक दिली. या विचित्र अपघातात ऑटोतील दोन महिला जागीच ठार झाल्या तर ऑटोचालकासह सहा जण गंभीर जखमी झाले.

जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. निर्मला लक्ष्मण जुमडे (५०, रा तांडापेठ, वैशालीनगर) आणि कौशल्या कुहीकर (६०, प्रेम नगर) असे अपघातात ठार झालेल्या म हिलांची नावे आहेत. तर ऑटोचालक सतीश गोमकाळे, दुर्गा नरेंद्र वैरागडे (६०, तांडापेठ), बेबीबाई मोतीराम आसोले (६०,तांडापेठ), इंदूमती भैसारे (६०, वैशालीनगर), विमला गोपाल धने (६०, तांडापेठ), रेखा पराते (६०, चंद्रभागानगर) अशी गंभीर जखमींची नावे आहेत.

एका लग्न समारंभात स्वयंपाकाचे काम करण्यासाठी निर्मला जुमडे, कौशल्या कुहीकर , दुर्गा वैरागडे, बेबीबाई आसोले , इंदूमती भैसारे, विम ला धने आणि रेखा पराते यांना जायचे होते. त्यांनी ऑटोचालक सतीश गोमकाळेने मगंळवारी सायंकाळी पाच वाजता खैरी मार्गाने जात असताना महिंद्रा शोरूमसमोर उभ्या असलेल्या क्रेनला भरधाव ऑटो धडकवला. या अपघातात निर्मला आणि कौशल्या या दोघीही जागीच ठार झाल्या. तर ऑटोचालक सतीशसह अन्य पाच म हिला गंभीर जखमी झाल्या.

अपघात होताच नागरिकांनी ऑटोतील जखमींना खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. नवीन कामठी पोलिसांनी आरोपी ऑटोचालक सतीश गोमकाळेविरुद्ध हयगयीने वाहन चालवून दोन महिलांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याबाबत गुन्हा दाखल केला. अपघातास कारणीभूत ठरलेली क्रेन रस्त्याच्या मधोमध उभी होती. त्यामुळे क्रेनचालकालाही पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

**भरधाव कार कठड्यावर आदळून युवक ठार**

भरधाव कार अनियंत्रित झाल्यानंतर रस्त्यावरील कठड्याला (रेलिंग) धडकली. या विचित्र अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन मित्र गंभीर जखमी झाले. ही घटना कामठी-नागपूर महामार्गावर मंगळवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास घडली. ही धडक इतकी जबरदस्त होती की, लोखंडी दांडा कारच्या समोरील भागातून शिरून आरपार मागच्या भागातून बाहेर निघाली.

या अपघातात रोशन निलांबर नाइक (२६, रा.तिरंगा चौक, रामगड, नवीन कामठी) हा ठार झाला तर सय्यद आमीर शहजाद सय्यद साबीर (२६, फुटानाओळी, कामठी) व अभिषेक शिवनारायण परमान (२८, रा. नवीन येरखेडा, दुर्गा सोसायटी, कामठी) हे दोघे गंभीर जखमी झाले.

## नवं सरकार बनण्याआधीच मोठं आव्हान सज्ज!

मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला आंदोलनाचा इशारा दिला आहे. राज्यात नवं सरकार स्थापन झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील पुन्हा एकादा बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. त्यांनी आज (२६ नोव्हेंबर) बीड येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी जाहीर केलं की सरकार स्थापन झाल्यावर मी तारीख जाहीर करेन. त्या तारखेपासून मी आंतरवाली सराटी येथे बेम ुदत उपोषणाला बसणार आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आवाहन केलं की आपण आपली आरक्षणाची लढाई आता तीव्र करू, उपोषणाची तारीख जाहीर केल्यानंतर आंतरवालीला या. आपण उपोषणाला बसू. सरकार आरक्षण देत नाही तोवर लढाई लढू. मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला आवाहन करत म्हणाले, तुम्ही वेगवेगळ्या पक्षातील वेगवेगळ्या उमेदवारांना मतदान केलं असेल, तुम्ही ज्यांना मतदान केलं ते उमेदवार निवडूनही आले असतील. त्या आमदारांशी आरक्षणासाठी भांडा. तो आमदार भाजपाचा असेल, काँग्रेसचा असेल, महाविकास आघाडी किंवा महायुतीचा असेल, मराठ्यांनी आता एकजूट करून त्या आमदारांना आरक्षणासाठी मदत करण्याचं आवाहन करा. आपल्याला आरक्षण मिळवावंच लागेल. त्यासाठी सर्व मराठ्यांनी आता एकजूट होऊन सामूहिक बेमुदत उपोषणाला बसायचं आहे. सरकार स्थापन झालं की मी प्रसारमाध्यमांद्वारे उपोषणाची तारीख सांगेन. त्या तारखेला अंतरवाली सराटीला या. उपोषणाच्या तयारीला लागा. तत्पूर्वी तुमची शेतातील कामं उरकून घ्या. सरकार स्थापन झालं की मी उपोषणाची तारीख सांगणार आहे. प्रत्येक कुटुंबातील काही सदस्यांनी उपोषणासाठी या. काही सदस्यांनी घर आणि शेती सांभाळा. दहा ते पंधरा दिवस तुमचं काम बुडेल, मात्र त्याची तयारी



ठेवा. आपण उपोषणाला बसू आणि आरक्षण मिळवू

**मनोज जरांगेंचा एल्गार...**

दरम्यान, यावेळी मनोज जरांगे पाटील यांना विचारण्यात आलं की तुम्ही किती दिवस उपोषणाला बसणार? त्यावर म नोज जरांगे पाटील म्हणाले, सरकार जोवर आम्हाला आरक्षण देत नाही तोवर मी उपोषण करत राहणार. आम्ही मरत नाही तोवर उपोषण करणार. मरेस्तोर उठायचं नाही असं मी सर्वांना सांगितलं आहे. मला बघायचंच आहे की हे सरकार आम्हाला आरक्षण कसं काय देत नाही.

**मनोज जरांगे यांचं मराठा समाजाला आवाहन**

जरांगे पाटील, मराठा समाजाला आवाहन करत म्हणाले, निवडणुकीचं, राजकारणाचं खुळ आता डोक्यातून काढून टाका. वेडेपणा करू नका. तुमचा नेता मंत्री झाला असेल, आमदार झाला असेल तर त्याच्या गुलालात नाचू नका. तो तुम्हाला नाचवेल. परंतु, तुमच्या मदतीला येणार नाही. तुमच्या लेकरांच्या मदतीला येणार नाही. तुमच्या लेकराला शाळा, महाविद्यालयात प्रवेश हवा असेल तर तिथे तो मदत करणार नाही. त्याला नोकरी लावून देणार नाही. आगामी काळात वेगवेगळ्या शासकीय विभागाच्या भरत्या निघणार आहेत, त्यामुळे आरक्षणासाठी तुटून पडा.

## पत्नीला सरपंच पद न मिळाल्याच्या रागातून मारहाण

**दि.२६, पिंपरी :** पत्नीला सरपंच पद न मिळाल्याच्या रागातून एकाने बिअरच्या बाटलीच्या काचेने डोळ्यावर मारून जखमी केले. तसेच, शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मोटार पाठीमागे घेत दुचाकीला ठोकरल्याची घटना खेड तालुक्यातील आहिरे येथे घडली. नारायण रामचंद्र अहेरकर (वय ५५, रा. अहिरे, ता. खेड) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. त्यांनी महाळूंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नितीन सखाराम तांबे (रा. आहिरे, ता. खेड) असे अटक आरोपीचे नाव आहे. अहेरकर यांची सून गेल्या चार वर्षापासून आहिरे गावच्या सरपंच आहेत. तर, तांबे याची पत्नी या ग्रामपंचायत सदस्या आहेत. सरपंच पदावरून अहेरकर आणि तांबे यांच्यात वाद आहेत. तांबे यांच्या पत्नीला सरपंच पद न मिळाल्याने त्यांना राग होता. अहेरकर हे रविवारी घरासमोर थांबले होते. यावेळी तांबे हा मोटारीतून आला. पत्नीला सरपंच पद न मिळाल्याच्या रागातून बिअरच्या बाटलीच्या काचेने अहेरकर यांच्या डोळ्यावर मारून जखमी केले. तसेच, शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मोटार पाठीमागे घेत अहेरकर यांच्या दुचाकीला धडक देऊन नुकसान केले. पोलीस हवालदार दिघे तपास करीत आहेत.

## प्राध्यापकाचे विद्यार्थिनीशी अश्लील चॅटिंग ! निलंबनासाठी अकोलेत रास्ता रोको...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अकोले (अहिल्यानगर) :** विद्यार्थिनीशी अश्लील चॅटिंग केल्याच्या आरोपावरुन येथील एका महाविद्यालयीन प्राध्यापकावर निलंबनाची कारवाई करावी, या मागणीसाठी झालेल्या आंदोलनामुळे अकोलेत काही काळ तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली होती. सकल हिंदू समाजाच्या नेतृत्वाखाली येथील महात्मा फुले चौकात काही काळ रास्ता रोकोही करण्यात आला. संबंधित संस्थेच्या सचिवांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली जाईल, समितीच्या अहवालानंतर योग्य ती कारवाई केली जाईल,असे आश्वासन दिल्यानंतर तणाव निवळला. अकोले शहरातील संबंधित महाविद्यालयातील एका प्राध्यापकाने विद्यार्थिनीशी अश्लील चॅटिंग केल्याच्या आरोपावरुन हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ संबंधित प्राध्यापकाच्या विरोधात निषेधाच्या घोषणा दिल्या. तेथून हा जमाव पोलीस ठाण्यात गेला. तेथे यासंबंधी निवेदन देण्यात आले व संबंधित प्राध्यापकावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. यानंतर घोषणा देत जमाव महात्मा फुले चौक येथे गेला. काही काळ रस्त्यावरील दुकाने बंद करण्यात आली. त्यामुळे शहर बंद सारखी स्थिती निर्माण झाली होती. महात्मा फुले चौक येथे काही वेळ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत संस्था पदाधिकारी व आंदोलक कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधला. यावेळी सकल हिंदू समाजाचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झालेले पाहायला मिळाले. संबंधित संस्थेच्या सचिवांनी या आरोपांबाबत त्रिसदस्यीय समिती नियुक्त करून चौकशीचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर तणाव निवळला.

## ईव्हीएम मशीन घोळ ! राज ठाकरे यांच्या भूमिकेकडे अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष

**अक्षराज : उदय दणदणे**



**दि.२६, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप- महायुतीला घवघवीत यश मिळाल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यात भाजप सह महायुतीला अनपेक्षित असं बहुमत आणि संख्याबळ मिळाल्याने मतदान प्रक्रियेवरच विरोधकांकडून सवाल उपस्थित केले जात आहेत. तर या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एकही उमेदवार निवडून न आल्याने हा पराभव मनसे सैनिकांच्या जिव्हारी लागला आहे,निवडणुकीच्या निकालानंतर राजसाहेब ठाकरे यांनी सोशल मीडियावर वरून अविश्वसनीय!तूर्तास एवढेच.. अशा मोजक्याच शब्दात मार्मिक प्रतिक्रिया व्यक्त केली होती , नुकतीच शिवतीर्थ येथे राजसाहेब ठाकरे यांनी चिंतन बैठकीचे आयोजन करत पराभूत उमेदवार यांची बैठक बोलावली होती, भाजपा बरोबर जाणे ही चूक झाली असल्याचे उमेदवारांकडून सांगण्यात आले.

निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर ईव्हीएम मशीन संदर्भात सोशल मीडियातून संशयास्पद अशा विवीध घटना समोर येत असून,मतदार जनतेतून,विरोधकांकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. मात्र ह्या सर्व घडामोडींवर मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे काय भूमिका घेतात याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.असे असले तरी ईव्हीएम मशीन घोळ बाबत मतदार जनतेत होत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी निवडणूक आयोगाला फार मोठी कसरत करावी लागणार आहे.

## दहशतवादी हल्लूयातील पोलीस हुतात्मांना अभिवादन

**दि.२६, मुंबई :** मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवादी हल्ला झाला. या हल्लूयात पोलीस जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज हुतात्म्य पोलीस अधिकारी व जवानांना पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली. १६ व्या हुतात्मा स्मृतीदिनी मुंबई पोलीस मुख्यालयातील पोलीस स्मारक येथे शहीद पोलीस अधिकारी आणि जवानांना पोलीस दलामार्फत आदरांजली अर्पण करण्यात आली. पोलीस बँड पथकाने 'सलामी शस्त्र' तसेच 'बिगुलर्स लास्ट पोस्ट' वाजविले. यावेळी पोलीस अधिकारी व जवानांनी हुतात्म्यांना सलामी देत अभिवादन केले.राज्यपालांनी हुतात्मा पोलीस कुटुंबातील सदस्यांची तसेच उपस्थित आजी व माजी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली. मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, उपनगर जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल,पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी देखील हुतात्म्यांना अभिवादन केले.

# संपादकीय



## संविधान...

२६ नोव्हेंबर, दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७५ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा. २६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला. संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला.

# न्यायालयाचे आदेश डावलनारी राजकीय बॅनरबाजी !

शहरे आणि गावांत नाक्यानाक्यांवर लावण्यात येणाऱ्या बेकायदेशीर होर्डिंग्समुळे शहरांचे आणि गावांचे विद्रुपीकरण होत असल्याचे उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या वेळोवेळी लक्षात आणून दिले आहे. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर विजयी उमेदवारांचे अभिनंदन करणाऱ्या होर्डिंग्स सर्वत्र लावण्यात येतील हे लक्षात घेऊनच उच्च न्यायालयाने राज्य सरकार, महापालिका, नगर परिषद आणि पोलिसांना सतर्क राहून कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश निवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वीच दिले होते.

न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्यास त्यास युडीडीचे प्रधान सचिव, पालिका आयुक्त, नगर पालिका प्रशासनाचे संचालक, जिल्हाधिकारी, पोलीस आस्थापना, मुख्य कार्यकारी अधिकारी वैयक्तिकरित्या जबाबदार असतील असेही न्यायालयाने बजावले आहे. असे असतानाही निवडणूक निकालानंतर त्याच रात्री सर्वत्र विजयी उमेदवारांचे अभिनंदन करणारे होर्डिंग्स शहरासह गावागावांत दिसून आले. यातील बरेचसे होर्डिंग्स हे विजयी झालेल्या उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने स्वतः लावलेले नाहीत, तर समाजातील त्यांच्या हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी स्वखर्चाने लावले आहेत असे होर्डिंग्सवरील शुभेच्छुकांची नावे आणि चेहरे यावरून दिसून येत असले तरी प्रत्यक्षात ते कोणाकडून प्रायोजित केले जातात हे सर्वांनाच ठाऊक आहे. निवडणुकीमध्ये बहुमताने निवडून देऊन जनतेने त्यांचे प्रतिनिधी निवडले आहेत; मात्र विजयाच्या उन्मादात न्यायालयाच्या आदेशांनाच डावलले जात असेल, तर ही मंडळी आपल्या कार्यकाळात कायद्याचा योग्य तो मान ठेवतील का अशी शंका मनात आल्यावाचून रहात नाही. निवडून आलेले लोकप्रतिनिधी जसे आनंदात असतात तसे त्यांचे शब्द झेलणारे, यांच्यावर प्रेम करणारे आणि त्यांच्या शब्दाखातर काहीही करण्याची तयारी असणारे त्यांचे कार्यकर्तेही आनंदात असतात. या आनंदाच्या भरात लावण्यात आलेल्या होर्डिंग्सबर कारवाई करणे म्हणजे त्यांच्या रोषाला सामोरे जाणे हे प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही माहित असल्याने हे सर्व अनधिकृत आहे आणि त्यावर कारवाई करण्याचे न्यायालयाचे आदेश आहेत हे माहित असतानाही कोणीही त्यावर कारवाई करण्यास धजावत नाहीत.

काहीनाकाही निमित्त साधून राजकीय पक्षांकडून नाक्या-नाक्यांवर होर्डींग्स, बॅनर्स आणि फलक लावणे आता नित्याचे झाले आहे. केवळ शहरांतच नव्हे तर ग्रामीण भागातही ही क्रेझ आज कायम आहे. पालिका प्रशासन, नगर परिषदा एकीकडे नगर-शहरांचे आणि गावांचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहेत, तर दुसरीकडे रस्त्यांवर होर्डिंग्स लावून परिसर बकाल करण्यामध्ये राजकीय पक्षांत चढाओढ लागलेली पहायला मिळते आहे.

मुंबई विद्रूप करणाऱ्या राजकीय बॅनरबाजीवर थेट उच्च न्यायालयानेच बंदी घातली आहे. तरीही बँनरबाजी करणाऱ्या मंडळींवर तिळमात्र फरक पडलेला नाही. सण, उत्सव जवळ आले कि ही बॅनरबाजी जोमात असते. नाक्यांवर लावण्यात येणारे बहुतांश होर्डिंग्स आणि बॅनर्स विनापरवाना लावलेले असतात. पुढाऱ्यांतील कलह आणि राजकीय पक्षांतील वादही बऱ्याचदा या बँनरबाजीतून चव्हाट्यावर आणले जातात. त्यांना उत्तर देण्यासाठी पुन्हा दुसऱ्या पक्षाकडून बँनरबाजी केली जाते. अनधिकृतपणे केलेल्या बँनरबाजीवर सुद्धा अनेकदा या राजकीय मंडळींकडून अधिकार दाखवले जातात. अनधिकृत होर्डिंग्स आणि बॅनर यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पालिका कर्मचाऱ्यांना पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण झाल्याचे प्रसंगही मुंबईत अनेकदा घडले आहेत त्यामुळे न्यायालयाचे आदेश असूनही अशा अनधिकृत बँनरबाजीवर कारवाई करताना पालिका कर्मचाऱ्यांवर बंधने येतात. आपल्या पक्षाचे होर्डिंग काढून त्याजागी दुसऱ्या पक्षाने होर्डिंग लावले म्हणूनही कार्यकर्त्यांमध्ये भांडणे आणि मारामाऱ्या होतात. ज्याचा ताण विनाकारण पोलीस प्रशासनावर पडतो.

सण-उत्सवांव्यतिरिक्त राजकीय पुढाऱ्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे वाढदिवस, विवाहसोहळे यानिमित्तानेही वर्षाचे बारा महिने बॅनरबाजी सुरूच असते. परिसरात कोणी मंत्री, राजकीय पुढारी, महनीय व्यक्ती येणार असेल तेव्हा प्रमख रस्त्यापासून समस्त परिसर होर्डिंग्स आणि बँनर्सने भरला होतो. या बॅनरबाजीमुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे, न्यायालयाकडून त्यावर वेळोवेळी ताशेरे ओढले जात आहेत याबाबत राजकीय नेतेमंडळींना पूर्णपणे कल्पना असूनही कोणताही राजकीय नेता आपल्या कार्यकर्त्यांना अशी बॅनरबाजी न करण्याबाबत सांगत नाही. त्यामुळे ही पोस्टरबाजी थांबणार तरी केव्हा असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## साळवाडी फाटा रस्त्याची दुर्दशा, अपघाताला निमंत्रण

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड ते भोकर रोडवर साळवाडी ला जाणाऱ्या रस्त्यांची अत्यंत दुर्दशा झाली आहे. साळवाडी फाट्याच्या काही अंतरावर भर रस्त्याला मधोमध मोठी भेग पडली आहे. सीमेंट रोड करताना मधोमध जी भेग मारलेली असते ती रस्ता दोन्ही बाजूला झुकल्या मुळे मोठी झाली आहे. त्या मोठ्या भेग झालेल्या जागेत दुचाकी वाहनांची चाके आडकली जात आहेत. त्यामुळे अपघात होत आहेत. जवळपास पाच वर्षांपूर्वी हा रस्ता झाला आहे. रस्ता केल्या नंतर मधोमध रस्ता कापला जातो. पण रस्त्याच्या दुतर्फा बाजुला सुरक्षित म्हणुन मुरुम टाकण्यात येतो. पण तो मुरुम व्यवस्थित न टाकल्यामुळे रस्ता दोन्ही बाजूला दबला जात आहे. त्यामुळे रस्त्याच्या मधोमध मोठी भेग पडली आहे. त्यामुळे दुचाकी वाहनांची चाके त्यामध्ये अडकत आहेत. व अपघात होत आहेत त्या मुळे दुचाकी घेऊन जाताना त्रास होतो आहे. साळवाडी गावातील नागरीकांची या बद्दल नाराजी आहे. पण या कडे कोणीही लक्ष देत नाही. मुदखेड - भोकर रस्त्याच्या साळवाडी फाट्याने गावात जा - ये करताना दुचाकी चालकांना तारेवरची कसरत करावी लागते आहे. दरम्यान या रस्त्यावर काही अपघातही झाले आहेत. त्यात रात्री च्या वेळी गावातून भोकर - मुदखेड रोडला जाणे येणे धोकादायक ठरले आहे. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावा अशी मागणी या गावातील नागरीक व्यक्त करत आहेत.

## जेता महत्व..

जेत्यांना नीत महत्व
उत्साहे जयजयकार
मिडीया करे कौतुक
समस्तकरती जोहार

परक्यागळ्या पडला
माझ्या गळा जो हार
उजाडआमचे शिवार
बहरले तिकडे बहार

सत्ते मध्ये बसणार ते
दिधलाज्यांनाआधार
अनपेक्षितअकल्पित
होई यशस्वी भरदार

पक्ष आमचापळवला
आम्ही मागतो उधार
कर्णाचा बने अवतार
उगाचचं झालो उदार

आपल्या हक्काच्या
घरा मध्ये किरायेदार
कितीदा नवीनभरती
सोडून पळले सरदार

पक्षबांधणी कैकवेळा
मनोधैर्य असे दमदार
नेतृत्व कर्तृत्व दाखवे
पुनर्जीवित हो वारंवार

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# जनतेलाच न पटणारा - जनमताचा 'कौल'

**महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा तसेच ऊपी, पंजाब, केरळ या राज्यांतील विधानसभा आणि लोकसभा पोटनिवडणुकीचे निकाल नुकतेच लागले, महाराष्ट्रात सर्वांचे अंदाज खोटे ठरले आणि भाजप, महायुतीला 'महायश' मिळाले तर 'मविआ' तील घटकपक्षांच्या पदरी महा पराजय पडला. अशा प्रकारचे निकाल लागतील याचा ना कोणाला अंदाज होता ना कोणी तसे भाकित केले होते. झारखंड मधे मात्र अंदाजा प्रमाणे काहीसे निकाल लागले.**




महाराष्ट्रात तर या पुर्वी ईतके बहुमत कोणालाही मिळाले नव्हते, या पुर्वी २२२ जागांचे बहुमत मिळाले होते,त्याच बरोबर यंदा पहिल्यांदाच विरोधी पक्षनेते कोणाला मिळावे ईतक्या जागा देखील कोणाला जिंकता आल्या नाहीत,या निकालाचे विश्लेषण, चर्वितचर्वण होत राहिल तसेच हा निकालांमुळे देशाच्या आणि राज्याच्या राजकारणाला, सत्ताकारणाला कोणती कलाटणी हे भविष्यात दिसेलच. मात्र या निकालाने गेल्या काही वर्षांपासून राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते, एक्झिट पोल, ओपिनियन पोल, विविध संस्था, वाहिन्यांद्वारे केले जाणारे सर्वे, वर्तविले जाणार अंदाज साफ चुकतात हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. त्याच बरोबर निवडणूक आयोगाची कार्यपद्धती , ईव्हीएम घोटाळा, सत्ताधारी पक्ष, निवडणुकीसाठी राबणारी यंत्रणा यांची कार्यपद्धती वारंवार वादग्रस्त ठरत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून निवडणूकी पुर्वी आणि मतदान झाल्यानंतर एक्झिट पोल, ओपिनियन पोल द्वारे जनतेचे मत जाणुन निकालांचा कस कसा असेल, कोणाला किती जागा मिळतील, कोण सत्ताधारी होऊ शकेल यासाठी एक्झिट पोल ची संकल्पना जगभर ऋढ झाली आहे, साधारणतः १९६० पासुन असे अंदाज वर्तविण्यात येत आहे, तीस चाळीस वर्षांपासून भारतात देखील एक्झिट पोल चाचण्या घेण्यात येत असून अंदाज वर्तविले जात आहे. असे सर्वेक्षण म्हटले की प्रणव रॉंय, विनोद दुआ, योगेंद्र यादव यांची नावे प्रामुख्याने पूढे येतात, त्याकाळी शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करून, दुरदर्शन वर निवडणूकांचे निकाल वर्तविले जात आहे आणि ते बहुतांशी अचुक ठरत असत तीन ते पाच टक्के कमीजास्त होत असत.

कालांतराने अनेक खाजगी एजन्सींनी ओपिनियन पोल, ऐक्झिट पोल चे अंदाज वर्तविण्यात सुरवात केली, खाजगी वाहिन्यांनी असे अंदाज प्रसारित करण्स सुरुवात केली आणि सब से तेज, सब से सटिक अंदाज वर्तविण्याची स्पर्धा लागली. असे सर्वेक्षण करण्यात मोठी आर्थिक उलाढाल होऊ लागली, मग राजकीय पक्ष आपापल्या फायदेशीर ठरावे यासाठी स्वतः वा यंत्रणांकडून सर्वे घेऊन अंदाज वर्तवले जाऊ लागले,यात मोठ्याप्रमाणावर पैशाचा खेळ होऊ लागला आणि असे सर्वेक्षण आणि अंदाज वर्तविणे हा जणु पैशाचा खेळ बनला इतका कि कोण सर्वेक्षण करतो आहे यावर कोणाचा एक्झिट पोल, कोणाला अनुकूल असणार हे स्पष्ट दिसु लागले.

गेल्या वर्षी राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड मधे अनपेक्षितपणे निकाल लागले, त्यानंतर लोकसभा निवडणुकीत अनेकांचे अंदाज चुकले तर हरियाणा मधील निकालांनी सगळ्यांनाच धक्का दिला.गेल्या काही निवडणुकांपासून निवडणूक आयोग आणि ईव्हीएम घोटाळा याची चर्चा वारंवार होत आहे. भाजप आणि काही समर्थक सोडले तर बहुतेकांना ईव्हीएम बाबत शंका आहे मात्र लोकशाहीच्या दृष्टीने, देशहितासाठी जर ईव्हीएम बाबत काही तक्रारी असतील तर त्याची शहानिशा होण्याऐवजी भाजप आणि निवडणूक आयोग पाठराखणच करत आहे. सर्वोच्च न्यायालय देखील याबाबत गांभीर्याने विचार करतांना दिसत नाही. महाराष्ट्रात ज्या पद्धतीचे निकाल लागले त्याचा अंदाज कोणालाच कसा आला नाही?.

चारच महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुती आणि भाजप ला केवळ १७ जागा मिळाल्या होत्या तर मविआ ने ३० आणि एक अपक्ष अशा जागा जिंकल्या होत्या. यावेळी मविआ ला अनुकूल वातावरण आहे असेच सर्वांचे अंदाज होते आणि लढत काँटे कि टक्कर अशीच होणार आणि निकाल देखील असेच काहीसे लागणार अशीच शक्यता होती, लागलेल्या निकालांनी सगळ्यांनाच आश्चर्य चकित केले आहे.

अगदी भाजप आणि महायुतीला देखील असे निकाल अपेक्षित नसणार, अन्यथा असे दावे अगोदरच केले गेले असते. सत्ताधारी पक्षाच्या हाती यंत्रणा, व्यवस्था, आणि मुख्य म्हणजे पैसा असतो आणि याचा गैरवापर करून निवडणुका जिंकता येतात हे काही देशाला नवीन नाही.गेल्या वर्षी राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड मधील निकालांनी देखील सगळ्यांनाच चकवा दिला होता. महायुतीला मिळालेल्या यशाचे विश्लेषण करतांना लाडकी बहिण, लाडका भाऊ, योजना तसेच इतर कल्याणकारी योजनांचा दाखला दिला जातो, मात्र निवडणूकीच्या तोंडावर या कल्याणकारी योजना नाही तर मतदारांना दिलेली लाचच आहे, या शिवाय आचारसंहितेचे धिंडवडे काढत मतांचे ध्रुवीकरण करण्यासाठी बटेंगे-कटेंगे, व्होट जिहाद, धर्मयुद्ध ची भाषा निवडणूक आयोगाच्या नाकावर टिच्चून वापरली गेली, अर्थात आजच्या निवडणूक आयोगाकडुन काही अपेक्षाच नाही. मतमोजणीच्या वेळीच सगळा खेळ होतो, मशीन बदलली जातात, ज्या मशीनची बॅटरी ९९ टक्के चार्ज रहाते तिथेच भाजप ला भरभरून मतदान होते हे निव्वळ योगायोग मानता येणार नाही. हरियाणा निवडणूकीच्या वेळी तर खुद्द भाजपलाच विजयाची खात्री नव्हती आणि काँग्रेसला सत्ता मिळणार असे अंदाज सर्वांनीच वर्तविला होता मात्र निकालाच्या दोन दिवस अगोदर मुख्यमंत्री सैनी यांनी 'सब ईंतजाम हो गया है' असे म्हणत भाजपच विजयी होणार हे आत्मविश्वासाने सांगितले होते आणि झालेही तसेच. निकालांवर आक्षेप घेतला कि ईतर ठिकाणी विरोधी पक्ष जिंकल्याचे दाखले दिले जातात त्यात काही तथ्य असले तरी निवडणूक आयोगाची कार्यपद्धती आणि ईव्हीएम घोटाळा या बद्दल शंका ऊपस्थित होण्यासारखेच निकाल लागत आहेत. आधुनिकतेच्या काळात मतदानाची टक्केवारी जाहीर करण्यात होणारा घोळ, ऊशिर, मतमोजणी साठी दोन चार दिवसांचा घेतला जाणारा कालावधी हे सगळे संशयकल्लोळ निर्माण करणारे आहे.

यावेळी गुजरात मधुन ईव्हीएम मशीन आणल्याची चर्चा आहे, गुजरात मॉडेल काय आहे हे आजवर देशाने अनेकदा पाहिले आहे. महाराष्ट्रात तर ऐतिहासिक निकाल लागले आहेत, 'मविआ' आघाडीला केवळ ५०-५५जागा मिळाव्या आणि भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांना छप्पर फाडके यश मिळावे असे वातावरण नक्कीच नव्हते. महाराष्ट्रात तर विरोधी पक्षनेते पद देखील कोणाला मिळणार नाही असे निकाल लागले कि लावले गेले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची प्रतिक्रिया बोलकी आहे.महाराष्ट्राचे निकाल कुणाच्याही पचनी पडत नाही. या निकालामुळे निवडणूक प्रक्रिया, निवडणुक आयोग, ईव्हीएम या बाबत साशंकताच निर्माण झाली आहे आणि ती निरर्थक म्हणता येणार नाही. अनेक तक्रारी होत असुनही त्याची कुठलीच दखल घेतली जात नाही. निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी देखील आपली बांधिलकी जनतेशी आहे, देशाशी आहे याची जाणीव ठेवत निर्भीडपणे, निष्पक्षपातीपणे आपले कर्तव्य पार पाडायला हवे, केवळ 'कुछ तो लोग कहेंगे लोगोंका काम है कहना...' अशी शेरोशायरी करुन चालणार नाही. म्हातारी मेल्याचे दुखः नाही पण काळ सोकावता कामा नये.राजीव कुमार यांनी कै. टी एन. शेषन यांना आठवावे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज
बुलडाणा, बुधवार, दि.२७ नोव्हेंबर २०२४


# संविधान अमृत महोत्सवी वर्षात 'घर घर संविधान' अभियान

## अधिकारांसोबत कर्तव्याबाबत ही जागरूक रहावे - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, छत्रपती संभाजीनगर** : भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या वर्षात 'घर घर संविधान' हे अभियान राबविण्यात येणार आहे. आज यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान उद्देशिकेचे सामुहीक वाचन करण्यात आले. प्रत्येक भारतीयाने संविधानाबाबत आदर बाळगावा व संविधानाने आपल्याला दिलेल्या अधिकाऱ्यांसोबत कर्तव्यांबाबत जागरूक राहून कर्तव्य पालनही करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात हा कार्यक्रम झाला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, डॉ.व्यंकट राठोड, एकनाथ बंगाळे आदी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखाप्रमुख व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, भारतीय राज्यघटना ही अथक परिश्रम आणि सखोल अभ्यासाअंती तयार करण्यात आलेला एक दस्तऐवज आहे. या संविधानाद्वारे आपल्या देशाचा कारभार चालतो.

या संविधानाने दिलेल्या समानता, बंधुता, सगळ्यांना संधीची समानता, स्वातंत्र्य अशा विविध मुलभूत अधिकारांमुळे आपले जीवन अधिक समृद्ध होत आहे. त्यामुळे आपण सगळ्यानी संविधानाप्रती कृतज्ञ असले पाहिजे. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करतांना आपण आपल्या कर्तव्यांप्रतीही जागरुक




असले पाहिजे,असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. प्रारंभी संगिता राठोड यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश कथन केला. सामुहिकरित्या संविधान उद्देशिकेचे वाचन झाले. त्यानंतर डॉ. सुचिता शिंदे यांनी संविधान निर्मितीची प्रक्रिया सांगितली. एकनाथ बंगाळे यांनी आभार मानून समारोप केला.

### असे आहे घर घर संविधान अभियान -

घर घर संविधान हे अभियान राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतीगृहे, शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित, विनानुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळा, आश्रमशाळा, वसतीगृहे, ग्रामिण व नागरी स्वराज्य संस्था अशा सर्व ठिकाणी भारतीय राज्य घटनेबाबत, घटनात्मक अधिकार, कर्तव्ये याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे.

### अभियानाचा उद्देश -

१. संविधानाचे महत्त्व, मूल्य, अंमलबजावणी याबाबत शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये तसेच भावी नागरिकांमध्ये जागरुकता वाढविणे. २. संविधानातील मुलभूत हक्क, कर्तव्ये आणि विविध तरतुदींचे शिक्षण देणे, त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्यायाची भावना रुजविणे. ३. भारतीय संविधानातील समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही मूल्यांचा प्रचार व प्रसार करणे, त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विविधतेतून एकता आणि समता या संकल्पनांचा विकास होईल. ४. संविधान अध्ययनानुळे आणि चर्चे द्वारे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांची जाणीव करुन देऊन त्यांच्या जबाबदारांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे. ५. व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा प्रचार व प्रसार करुन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे.या उद्दिष्टांनुसार सन २०२४-२५ हे वर्ष संविधान अमृत महोत्सवी वर्ष असून घर घर संविधान अभियान राबविण्यात येणार आहे.

### अभियानाचे स्वरुप -

त्यासाठी शाळा महाविद्यालये वसतिगृह यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान उद्देशिकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करुन घेणे, शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रति विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे, भारतीय संविधानाबाबत सर्वसाधारण माहिती जसे निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर व्याख्यान आयोजित करुन माहिती देणे, विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क आणि कर्तव्ये यावर मार्गदर्शन करणे. कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्वज्ञान आणि मूल्य समजावून सांगणे, संविधान मूल्ये या विषयावर पथनाट्य तयार करणे, शाळा महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, प्रदर्शन आयोजित करणे, संविधान दिन कार्यक्रम आयोजित करणे, संविधानावर आधारीत निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा इ. उपक्रमांचे आयोजन करणे, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण करणे , स्थानिक स्वराज्य संस्थांनी वार्षिक, मासिक सभा, ग्राम सभांमध्ये प्रास्ताविकेचे वाचन करावे. जिल्हानिहाय संविधान संमेलन आयोजित करण्याचे निर्देश शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

### जिल्हास्तरीय समिती करेल नियोजन -

संविधान कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती तयार करण्यात आली असून जिल्हाधिकारी हे समितीचे अध्यक्ष असून निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव आहेत. या समितीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व मुख्याधिकारी नगरपालिका, नगरपंचायत, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, महिला व बालविकास अधिकारी जिल्हा परिषद, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण हे सदस्य असतील. जिल्हास्तरीय समिती ही वार्षिक योजना तयार करुन विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करेल.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून विविध पदांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या विविध संवर्गांच्या पदांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. दिनांक २७ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नवी मुंबई येथील सीबीडी बेलापूर कार्यालयात या मुलाखती घेण्यात येतील.

तालुका क्रीडा अधिकारी संवर्गाच्या पदभरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आलेल्या चाळणी छानणी अंती मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ५ व ६ डिसेंबर, २०२४ रोजी आयोगाच्या नवी मुंबई कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

**इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब -**

इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी संवर्गाच्या पदभरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आलेल्या छाननीअंती मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ तसेच दिनांक ३ व ४ डिसेंबर, २०२४ या कालावधीत आयोगाच्या नवी मुंबई कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

**प्राध्यापक क्षयरोगशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (गट-अ) -**

विविध संवर्गाच्या पदभरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आलेल्या छाननी अंती, चाळणी अंती मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २७ व २८ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत आयोगाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

प्राध्यापक, क्षयरोगशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ ची मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात येतील. सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकित्साशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ,ची मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४, सहयोगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (धाराशिव)ची मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४, सहयोगी प्राध्यापक, नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (नंदुरबार)ची मुलाखत


दि. २७ नोव्हेंबर, २०२४ सहयोगी प्राध्यापक, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (परभणी)ची मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४ सहयोगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ ची मुलाखत दि.२७ व २८ नोव्हेंबर, २०२४सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, परभणी गट- अ ची मुलाखत दि.२७ व २८ नोव्हेंबर, २०२४ राध्यापक, विकृतीशास्त्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ सिंधुदुर्ग ची मुलाखत दि.२८ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात येतील.

# लेखक, दिग्दर्शक, अभिनेते 'नागराज मंजुळे' यांचा 'महात्मा फुले समता' पुरस्काराने होणार गौरव

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई** : अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले पुण्यतिथीच्या दिवशी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिला जाणारा 'समता पुरस्कार' यावर्षी प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक, अभिनेते नागराज मंजुळे यांना देण्यात येणार आहे. या पुरस्कारामध्ये रुपये एक लक्ष, फुले पगडी, मानपत्र शाल आणि स्मृतीचिन्ह यांचा समावेश आहे. सदर पुरस्कार गुरुवार, दि.२८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता समता भूमी, फुले वाडा, पुणे येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पुणे विभागीय अध्यक्ष प्रीतेश गवळी, शहर अध्यक्ष पंढरीनाथ बनकर, महिला शहर अध्यक्ष वैष्णवी सातव यांनी दिली आहे.

या सोहळ्यासाठी सामाजिक व




राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच समता परिषदेचे पदाधिकारी व राज्यभरातून समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने दरवर्षी महात्मा फुले पुण्यतिथी समता दिनाच्या निमित्ताने 'महात्मा फुले समता पुरस्कार' सामाजिक, राजकीय, साहित्य, पत्रकारिता यासारख्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना देण्यात येतो.

या अगोदर माजी केंद्रीय कृषीमंत्री खा.शरदचंद्र पवार, माजी केंद्रीय मंत्री विरप्पा मोईली, खा.शरद यादव, छत्तीसगढ राज्याचे मुख्यमंत्री भूपेश बघेल, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, ज्येष्ठ लेखक डॉ.भालचंद्र नेमाडे, डॉ.बी.एल.मुणगेकर, लेखिका अरुंधती रॉय, प्रा.डॉ.मा. गो.माळी, ज्येष्ठ साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो, ज्येष्ठ कवी समीक्षक यशवंत मनोहर, डॉ. तात्याराव लहाने, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, कै.प्रा.हरी नरके यांच्यासह अनेक दिग्गजांचा समता पुरस्काराने गौरव करण्यात आलेला आहे.

यंदाच्या वर्षी या पुरस्कारासाठी लेखक, दिग्दर्शक, अभिनेते नागराज मंजुळे यांची निवड करण्यात आली आहे. नागराज मंजुळे यांचे नाव मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीत अग्रक्रमाने घेतले जाते. नागराज मंजुळे हे एक दिग्दर्शक, अभिनेते, निर्माते, पटकथा लेखक, कवी आहेत, ज्यांनी एकापेक्षा एक कलाकृती भारतीय चित्रपटसृष्टीला दिल्या आहेत. त्यांना वास्तववादी लेखन, दिग्दर्शन आणि चित्रपट निर्मिती करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाते. आजवर त्यांना अनेक नामांकित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांनी आपल्या कार्यातून महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचा सामाजिक वारसा विकसित केला. त्यांनी केलेल्या अलौकिक कार्याची दखल घेत त्यांना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सन २०२४ चा मानाचा 'समता पुरस्कार' देऊन गौरविण्यात येत आहे. या समता पुरस्कार सोहळ्यास सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असून सर्व फुले प्रेमी, समता सैनिकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# थोडक्यात

## पेण शहरात साई बाबांच्या भव्यदिव्य मिरवणुकीचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पेण** : श्री साई बाबांची मानाची पालखी मिरवणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण तर्फे भव्यदिव्य मिरवणुकीचे पेण शहरात आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दिनांक २८ नोव्हेंबर रोजी संपूर्ण पेण शहर साईमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. पेण साई मंदिर कासार तलाव येथून सायंकाळी पाच वाजता विद्युत रोषणाई, ब्रास बँड पथकाच्या सुंदर संगीताच्या तालावर मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. या मिरवणूक सोहळ्यामध्ये चलचित्र रथ शामिल होणार आहेत. यामध्ये द्वारकामाई मंदिर, बैलगाडी हाकताना साईबाबा, हुबेहुब दिसणारे साईबाबा यांचा विशेष समावेश असतो. पेण साई मंदिरा पासून सुरू होणारी मिरवणूक तेरा घरांची आळी, चावडी नाका, आंबेडकर चौक, नगरपालिका चौक, राजू पोटे मार्ग, कोळीवाडा, महाविर मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कासार आळी, हनुमान आळी आणि पुन्हा साई मंदिर येथे फिरणार आहे. पालखी मार्गावर सर्वत्र भगवे पताके, भगवे झेंडे लावण्यात आले आहेत. घरासमोर मिरवणूक आल्यानंतर प्रत्येक महिला आरती ओवाळून औक्षण करत असते. शेवटी साई बाबांच्या महाआरतीने व महाप्रसादाने मिरवणुकीची सांगता होणार आहे.

त्यानंतर शुक्रवार, दिनांक ०६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजता साई बाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ होणार आहे. गेली १६ वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डी पर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. सदर मिरवणूक पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मिथिलेश भानुशाली व त्यांचे शेकडो सहकारी साई सेवक गेली महिनाभर दिवस रात्र मेहनत घेत आहेत. पेणकर वर्षभर या श्री साई बाबांच्या भव्यदिव्य मिरवणुकीची वाट पाहत असतात.

## तवा आश्रम शाळेत केंद्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.२६, डहाणू (पालघर)** : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रम शाळा तवा येथे दोन दिवशीय शालेय केंद्र स्तरीय क्रीडा स्पर्धेत आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २६ नोव्हेंबर रोजी या क्रीडा स्पर्धा कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे. आश्रम शाळेतील विदयार्थ्यांच्या कला, गुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी ह्या क्रीडा स्पर्धांचे नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात येतात. तवा आश्रम शाळा ही केंद्र शाळा असून प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या सहभागी शाळा तवा, नानिवली, मेंढवण, महालक्ष्मी, या शासकीय आश्रम शाळा तर धुंदलवाडी, चिंचले, नागझरी ह्या अनुदानित आश्रम शाळा मधील जवळपास ५६० मुलां मुलींनी या क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेतला असून यामध्ये कबड्डी, खो-खो, रिले धावणे हे सांघिक खेळ तर १०० मिटर धावणे ते ८०० मिटर धावणे, गोळा फेक, भाला फेक, उंच उडी, लांब उडी आदी वैयक्तिक खेळ प्रकारात विद्यार्थी आपले खेळातील नैपुण्य गुण दाखवत असतात. या कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांनी संविधान दिवस असल्याने संविधानाची शपथ घेत कार्यक्रमाला सुरवात केली. तसेच विदयार्थ्यांनी शिस्त बद्ध संचलन करत कार्यक्रमाला दिमाखात सुरवात केली. या शालेय क्रीडा स्पर्धेत ची प्रस्तावना तवा आश्रम शाळेचे मुख्यध्यापक संतोष सागर यांनी केली, तर उल्हास सातवी मुख्यध्यापक धुंदलवाडी यांनी विदयार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून देत प्रत्येक विदयार्थ्यांनी खेडाळू वृत्ती दाखवली पाहीजे, असे सांगत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तवा शाळेचे शिक्षक योगेश जगताप व शिक्षिका अंजली श्रीराव यांनी केली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, ग्रामपंचायत सदस्य, सहभागी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत संविधान दिन संपन्न

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**



**दि.२६, कल्याण (ठाणे)** : भारतीय संविधान दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच यावेळी उपस्थित असलेल्या बहुसंख्य अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यानंतर २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईतील दहशतवादी हल्लयात शहीद झालेल्या नागरिकांना व दहशतवाद्यांशी लढा देताना शहीद झालेल्या हुतात्म्यांना आदरांजली वाहून मौन पाळण्यात आले. महापालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांतही संविधान दिन साजरा करण्यात आला. तसेच प्रभाग स्तरावर सहा.आयुक्त आणि कर्मचाऱ्यांनी देखील संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

## किनवट येथे संविधान दिन साजरा

**अक्षराज : मांगीलाल राठोड**

**दि.२६, किनवट (नांदेड)** : विविध धर्म, संप्रदाय, भाषा, चालिरीती असतानाही, सर्वांमध्ये एकात्मता उत्पन्न करणारे असे देशाचे संविधान आहे. या संविधानाने आपल्या देशात अद्वितीयरितीने लोकशाही शासन दृढमूल केले आहे. म्हणून त्याचा आपल्या जीवनात महत्व आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या उत्तुंग प्रतिभेची ते साक्ष आहे. संविधान दिन २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसुदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्र नंतर या समितीने सादर केलेला. अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समितीने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून किनवट तालुक्याचे कॉँग्रेस नेते लक्ष्मीपती दोन पल्लीवार यांच्या सहकार्यातून व मित्र मंडळ सविधान दिवस साजरा करण्यात आला.